# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मुंबई महानगरपालिकेच्या के (पश्चिम) विभागातील अनधिकृत बांधकामाबाबत**

**(१) २१४० (२३-१२-२०१४). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या के/पश्चिम विभागामध्ये अंधेरी स्टेशन रोड, जुहू जिमखाना, जुहू वर्सोवा लिंक रोड, भारत नगर येथील गॅरेज, मिठीबाई ते कुपर रूग्णालय, मेसडॉक इमारती बाहेर, सीझर रोड, गणेश नगर एन.दत्ता मार्ग येथे अनधिकृत बांधकाम, फेरीवाले व तात्पुरत्या प्लॅस्टिकच्या झोपड्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या के/पश्चिम विभागामार्फत कारवाई करण्यात येणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पश्चिम विभागामध्ये अंधेरी स्टेशन रोड येथे अनधिकृत फेरीवाले आहेत. मात्र जुहू वर्सोवा लिंक रोड, मिठीबाई ते कुपर रुग्णालय, मॅस डॉक इमारतीबाहेर, सीझर रोड, गणेश नगर, एन.दत्ता मार्ग येथे कुठल्याही प्रकारचे अनधिकृत फेरीवाले नाहीत. जुहू वर्सोवा लिंक रोड येथे रोडवर प्लॅस्टिकच्या झोपडया आहेत व जिल्हाधिकारी प्लॉटवर अनधिकृत झोपडया तसेच भारत नगर येथे अनधिकृत गॅरजेचे आहेत.

(२) होय. सदर भागातील अनधिकृत फेरीवाल्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/ पश्चिम विभागामार्फत मुंबई महापालिका अधिनियम १८८८ च्या कलम ४१५, ४१६ व ४८८ अन्वये उघडे व दुषित अन्न नष्ट करण्याची कारवाई करण्यात येते.तसेच सदर अनधिकृत फेरीवाल्यांवर मुंबई महापालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३४१ (सी) अन्वये अतिक्रमण निष्कासननाची कारवाई करण्यात आली आहे. सदर फेरीवाल्यांवर जानेवारी २०१५ मध्ये, दुषित अन्न नष्ट करणे, फेरीवाल्यांचे सामान उचलून नेणे, फेरीवाल्यांचे प्लॅस्टिक शेड व अनधिकृत बांधकाम निष्कासित करणे अशी कारवाई बृहन्मुंबई महानगरपालिकेमॉर्फत करण्यात आली आहे. तसेच गुलमोहर रोड (मिठीबाई कॉलेज) येथील दोन झुणका भाकर केंद्र, त्यांना पर्यायी जागा देऊन निष्कासित करण्यात आली आहेत.

जुहू वर्सोवा लिंक रोडवारील प्लॅस्टिकच्या झोपडया तसेच जिल्हाधिकारी प्लॉटवरील अनधिकृत झोपडयांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येत. तसेच भारत नगर येथील अनधिकृत गॅरेजना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई महापालिका अधिनियमाचा कलम ३५१ अन्वये दिनांक १३.०९.२०१४ रोजी बजावण्यात आल्यानंतर दिनांक ०७.०३.२०१५ रोजी सदर ठिकाणी निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वर्सोवा बीच व त्या परिसरातील अनिधिकृत झोपडयांबाबत**

**(२) २१४४ (२३-१२-२०१४). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्सोवा बीचवर व वर्सोवा बीच लगतच्या तिवरांच्या जंगलामध्ये अनधिकृत झोपड्या, तबेला, अनधिकृत मेथी शेती व घोड्याचे तब्बले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिकारी व महानगरपालिका व पोलिसांकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) वर्सोवा बीचवरील सदरची अतिक्रमणे उपजिल्हाधिकारी (अति/निष्कासन) यांच्यामार्फत वेळोवेळी निष्कासित करण्यात आली आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदरची अतिक्रमणे दिनांक ०६ डिसेंबर, २०१४ रोजी निष्कासित करण्यात आले असून सदरची जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निरीक्षणाखाली आहे.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांनी दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी दिलेल्या तक्रारीवरुन बेकायदेशीररित्या गुरांचा तबेला बांधणाऱ्या व्यक्तीविरुध्द वर्सोवा पोलीस ठाणे येथे कलम १५ (१)(२) पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर भागात पोलीसांची प्रभावी गस्त ठेवण्यात आली आहे. सदर भागात अतिक्रमणासंबंधी काही आढळून आल्यास कारवाईच्या वेळी आवश्यक असणारी पोलीसांची मदत पुरविण्यात येईल याबाबत संबंधित आस्थापनांना कळवि ण्यात आले आहे.

---

**चांदेरी खुर्द.( ता. तिरोडा, जि. गोदिया) आबादी प्लॉट**
**सरकार जमा करुन गरजू लोकांना मिळण्याबाबत**

**(३) २१४९ (२३-०२-२०१४). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चांदोरी खुर्द गांव (ता.तिरोडा, जि.गोंदिया) वैनगंगा नदीच्या तीरावर वसलेले असून सन २००५ - २००६ या वर्षी नदीच्या पुराचे पाणी गावातील १ कि.मी. अंतरापर्यन्त गेल्याने गावात मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झाले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भविष्यात पुन्हा पुरामुळे जिवित हानी होऊ नये म्हणून सन २००६ ला शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून गावक-यांना जमीन सोडण्याचे व त्यांचे पुनर्वसन करण्याचे शासनाचे आदेश झालेले असतानाही संबंधितांचे अद्यापपर्यंत पुनर्वसन करण्यात आले नाही, हे ही खारे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत ग्रामस्थानी वारंवार, जिल्हाधिकारी कार्यालय व सार्वजनिक बांधकाम व अन्य संबंधित अधिकारी यांच्याकडे तक्रारी केल्या असतानाही अद्यापपर्यंत सदरील गावकऱ्यांचे पुनर्वसन न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, संबंधित गावकऱ्यांचे त्वरीत पुनर्वसन करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, साधारणत: केंव्हापर्यंत त्याचे पुनर्वसन करणे अपेक्षित आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून गावकऱ्यांना जमीन सोडण्याचे व त्यांचे पुनर्वसन करण्याचे शासनाचे आदेश नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आजरा व गारगोटी (जि. कोल्हापूर) या दोन ग्रामीण**
**रुग्णालयांना उपजिल्हा रुग्णालयाच्या दर्जाबाबत**

**(४) २१७० (२२-१२-२०१४). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजरा व गारगोटी (जि.कोल्हापूर) या दोन ग्रामीण रुग्णालयांना उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा दिलेला आहे. हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, शासन निर्णय होऊन सुध्दा अद्याप अंमलबजावणी करण्यात आली नाही हे खरे आहे काय ?

(३) असल्यास याबाबतची कारणे काय आहेत

**डॉ. दीपक सावंत (०२-०७-२०१५) :**(१) हे खरे आहे.

शासनाने शासन निर्णय दि. १७ जानेवारी, २०१३ नुसार आजराव गारगोटी (भुदरगड) जि.कोल्हापूर येथील ग्रामणी रुग्णालयाचे ५० खाटांमध्ये श्रेणीवर्धीत करण्यास मान्यता दिलेली आहे.

(२) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय आजरा व गारगोटी (भुदरगड) जि.कोल्हापूर येथील श्रेणीवर्धित ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाची बांधकामाची अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्याबाबत संबंधित उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना संबंधित वैद्यकीय अधिक्षक यांनी अनुक्रमे दि. २३.१२.२०१४ व दि. २७.११.२०१४ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हा-प्राथमिक आरोग्य केंद्रातील कंत्राटी चालकांवर उपासमारीची वेळ आल्याबाबत**

**(५) २१८२ (२३-१२-२०१४). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा-प्राथमिक आरोग्य केंद्रात २४ तास कार्यरत कंत्राटी चालकांना अत्यल्प मानधन मिळते तेही चार चार महिने वेळेवर मिळत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(२) पुणे जिल्ह्यात ५५ कंत्राटी चालक असुन त्यांना महिन्याला केवळ ५६०० रूपये मिळतात रात्री अपरात्री अतिदुर्गम भागातुन प्रसुती रूग्णांसाठी लगेच रुग्णवाहिका घेऊन जावे लागते त्या रूग्णाला घरी सोडल्यास फक्त ५० रूपये मिळतात, हे ही खरे आहे काय,

(३) कंत्राटी चालकांना कमी पगारात काम करावे लागत आहे त्यांची पगार वाढ व इतर सुविधांबाबत शासन स्तरावर निर्णय झाला आहे काय, असल्यास, निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासुन आमलात येणार आहे, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

कंत्राटी वाहनचालकांकरिता ठेकेदारास प्रती वाहनचालक रु.७१००/- इतके अदा केले जातात. या व्यतिरिक्त प्रसुती रुग्णांना आणणे व घरी सोडण्यासाठी कंत्राटी वाहन चालकांना शारदा ग्राम आरोग्य संजीवनी कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद निधीतून प्रती रुग्ण रुपये १००/- प्रमाणे अदा करण्यात येतात.

(३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, दिनांक ०२.०२.२०१३ नुसार नियमित वाहन चालकाच्या एकूण मासिक वेतनावर होणाऱ्या खर्चाच्या कमीतकमी १० ते २५ टक्के इतकी बचत होईल अशा रितीने बाह्य यंत्रणांद्वारे कामे करुन घेण्याबाबत सूचित करण्यात आले असल्याने या बाबत आरोग्य सेवा संचालनालयाने दि. २६.०३.२०१४ च्या पत्रान्वये सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना कळविले आहे.

---

**उमा बॅरेज प्रकल्पाच्या (जिल्हा अकोला) पर्यावरण प्रस्तावास अंतिम मान्यता मिळण्याबाबत**

**(६) २१९२ (०६-०४-२०१५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमा बॅरेज प्रकल्पाच्या (जिल्हा अकोला) पर्यावरण प्रस्तावास अंतिम मान्यतेसाठी आवश्यक असलेली जनसुनावणी प्रदुषण नियंत्रण मंडळाद्वारे दिनांक ६ ऑक्टोबर, २०१२ रोजी प्रकल्पस्थळी संपन्न झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जनसुनावणीचा कार्य अहवाल अद्याप पर्यंत पर्यावरण मंत्रालयास प्रदुषण नियंत्रण मंडळ अकोला यांच्याक्रडून सादर करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, उक्त प्रकरणी विलंबास जबाबदार असणा-या अधिका-यांवर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच, उक्त प्रकल्पाच्या पर्यावरण प्रस्तावास अंतिम मान्यता देण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (३०-०६-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) उमा बॅरेज, जि. अकोला प्रकल्पाचा जनसुनावणी कार्य अहवाल पर्यावरण विभागास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दिनांक १०/२/२०१५ रोजी प्राप्त झाला होता तथापि सदर जनसुनावणी अहवालास संबंधित जिल्हाधिकारी अकोला यांची मान्यता घेण्यात आलेली नव्हती.

सदर जनसुनावणी अहवाल परिपूर्ण अवस्थेत पर्यावरण विभागास पाठविण्याची जबाबदारी सबंधित प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अकोला यांची होती. मध्यंतरीच्या कालावधीत प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अकोला हे सेवा निवृत्त झाले आहेत. उक्त जनसुणावणी अहवालावर सदर जनसुनावणीचे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी, अकोला यांची मान्यता का घेण्यात आली नाही याबाबतचा खुलासा त्यांच्याकडून मागविला असता त्यांनी याबाबतची प्रक्रिया पूर्ण करणे नजर चूकीने राहून गेले म्हणून मान्य केले असून त्यांनी याबाबतचा माफीनामा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर केला आहे.

सद्यस्थितीत विभागास प्राप्त झालेला उमा बॅरेजचा प्रस्ताव जनसुनावणीच्या अध्यक्षांच्या मान्यतेविना विभागास प्राप्त झाल्याने सदरचा प्रस्ताव ग्राहय ठरत नसल्यामुळे यावर कार्यवाही करणे नियमानुसार उचित ठरणार नाही.

(४) सदरचा विलंब शासन स्तरावरुन झालेला नाही.

---

**जळगांव महानगरपालिकेने शहराचा विविध विकास योजनांचा सादर केलेला प्रस्ताव**

**(७) २१९४ (२३-१२-२०१४). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव महानगरपालिकेने शहराचा विविध विकास योजनांचे सुमारे रु. १८०१.९८ कोटीचा प्रस्ताव सादर केला होता त्यामध्ये ब-याच कोटीची वाढ झाली असून सदर प्रस्ताव सन २००९ पासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाला मान्यता देण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) जळगांव शहरातील पाणी पुरवठा व भुयारी गटार योजनांचे अनुक्रमे रुपये २०८.१४ कोटी व रुपये २१७.१२ कोटी किंमतीचे प्रकल्प प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियांनाअंतर्गत राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समिती समोर ऑगस्ट, २०११ मध्ये सादर करण्यात आलेले होते. समितीने सदर प्रस्तावांमध्ये असलेल्या त्रुटीची पूर्तता करुन प्रस्ताव फेरसादर करण्याच्या सूचना जळगाव महानगरपालिकेस राज्यस्तरीय मान्यता समितीमार्फत देण्यात आलेल्या आहेत. जळगाव महानगरपालिकेकडून फेरप्रस्ताव सादर झाला नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील भांडूप (प) येथील शिवाजी तलावाचे सुशोभिकरण तसेच भोवतालच्या झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(८) २२८० (२३-१२-२०१४). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील भांडूप (प) येथील शिवाजी तलावाचे सुशोभिकरण तसेच भोवतालच्या झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्याबाबत रहिवाश्यांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, नगरसेवक यांनी एकत्रितपणे मा.महसूल मंत्री यांना दिनांक ६ जून, २००७ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात दिनांक ३१ ऑगस्ट, २००७ रोजी मंत्रालयात बैठक आयोजित करुन तात्काळ निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे काय,
(३) असल्यास, याबाबत काय कार्यवाही करण्यात आले आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) सदर विषयाबाबत तत्कालीन महसूल मंत्री यांच्या दालनात दिनांक ०१.०८.२००७ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत, भांडुप (प) येथील शिवाजी तलावाभोवतालच्या झोपडपट्टीवासियांचे निष्कासन/पुनर्वसन तसेच शिवाजी तलाव परिसरातील जमिनीचा विकास/सुशोभिकरण इत्यादी कामे त्वरेने करण्याचे निर्देश तत्कालीन महसुल मंत्री यांनी दिले होते.
(३) सदर तलावाची जागा ही महानगरपालिकेच्या ताब्यात असून, तलावाच्या परिसरात व लगतच्या सरदार प्रतापसिंग मार्गावर महानगपालिकेचा दवाखाना, ५२ रहिवाशी व ३२ अनिवासी अशी एकूण ८४ बाधीत बांधकामे होती. त्यापैकी एकूण ७९ बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत व उर्वरित ५ बांधकामांना न्यायालयीन स्थगिती मिळाल्यामुळे त्यांचे निष्कासन होणे बाकी आहे. तसेच पात्र निवासी झोपडीधारकांना नाहूर (प.) स्थित एमएमआरडीए वसाहतीत पर्यायी सदनिका देण्यात आल्या आहेत. अनिवासी गाळेधारकांना कांजुरमार्ग (पूर्व) येथील लोढा वसाहतीमध्ये पर्यायी अनिवासी गाळे देण्यात आले आहेत.

शिवाजी तलावाच्या सुशोभिकरणाच्या दृष्टीकोनातून तलावाची खोली वाढविण्यात आली आहे. तसेच तलावातील गाळ काढण्यात आला असून, तलावात एक पोहोच रस्ता (रॅम्प) बनविण्यात आला आहे व तलावाभोवताली संरक्षक भिंत/कुंपण भिंत बांधण्यात आली आहे. सरदार प्रतापसिंग मार्गावरील बांधकामे हटवून रूंदीकरण केलेल्या भागात रस्ता पर्जन्य जलवाहिनी बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

ज्या ५ बांधकामांना न्यायालयीन स्थगिती देण्यात आली आहे त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत असून, न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**माजी, आजी आमदार तसेच कर्मचा-यांना वैद्यकीय देयके प्रतिपूर्तीबाबत**

**(९) २२८२ (२२-१२-२०१४). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजी, आजी आमदार तसेच कर्मचा-यांना वैद्यकीय देयके प्रतिपूर्तीसाठी शासनाने दिनांक ३० डिसेंबर, २०१० रोजी शासन निर्णयाच्या विवरण पत्रामध्ये देयकांच्या एकूण ३ टक्के शुल्क रुग्ण प्रशासनाकडे भरण्याचे नमुद केले आहे काय,

(२) असल्यास, यापुढे असे शुल्क विद्यमान आमदार व माजी सदस्यांना वैद्यकिय देयकांवर न आकारण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) असल्यास, अशी किती वैद्यकिय बिले निर्णया अभावी प्रलंबित आहे ?

**श्री. विनोद तावडे (३०-०६-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.

दि. ३०/१०/२०१० च्या शासन निर्णयातील विविरणपत्रामध्ये वैद्यकीय प्रतिपूर्ती मिळविण्यासाठी प्रमाणपत्र मिळण्याकरीता बिलाच्या एकूण रकमेच्या ३% रक्कम आकारण्यात येईल असे नमूद केले आहे. तथापि,हे विनाशुल्क रुग्ण उपचाराची सवलत प्राप्त असलेल्या संवर्गांना जसे, शासकीय कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय, आमदार, खासदार, न्यायाधीश व इतर यांना हे रुग्ण शुल्क लागू नाही. याबाबत आवश्यक खुलासा विधानमंडळ सचिवालयास दि.१०/१२/२०१४ च्या पत्रान्वये करण्यात आला आहे.

(३) देयके प्रलंबित नाहीत.

---

**धुळे जिल्ह्यातील शिपुर, शिंदखेड, साकी तालुक्यात वेगवेगळया घटनांमध्ये विनयभंगाच्या गुन्ह्याबाबत**

**(१०) २३१९ (२३-१२-२०१४). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील शिपुर, शिंदखेड, साकी तालुक्यात वेगवेगळया घटनांमध्ये माहे नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास विनयभंग करण्याचा प्रयत्न केल्याचे गुन्हे स्थानिक पोलिस स्थानकांत नोंदविण्यात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी आतापर्यंत किती जणांना व केव्हा अटक करण्यात आली आणि त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली,
(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) धुळे जिल्ह्यातील शिपुर, शिंदेखेड, साकी तालुक्यात वेगवेगळ्या घटनांमध्ये माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये विनयभंग करण्याचा प्रयत्न केल्याचे एकूण ६ गुन्हे पेलीस ठाण्यात नोंदविण्यात आले आहेत. सदर गुन्ह्यात पकडण्यात आलेले आरोपी व त्यांच्यावर करण्यात आलेली कारवाई पुढीलप्रमणे आहे.

| अ.क्र. | पोलीस स्टेशन/अपराध क्रमांक/लावण्यात आलेली कलमे | आरोपींच्या अटकेबाबत केलेली कारवाई |
|---|---|---|
| १. | शिरपूर तालुक्यातील थाळनेर पोलीस ठाणे गुन्हे रजिस्टर नंबर ५२/२०१४, दिनांक २१.११.२०१४ भारतीय दंड विधान कलम ३५४,३२३,५०४,५०६,३४ | सदर घटनेमध्ये एकूण ४ आरोपी असून ते फिर्यादीचे दीर व सासूसासरे आहेत. सदर गुन्हा हा न्यायालयाकडून सी.आर.पी.सी. कलम १५६ (३) अन्वये प्राप्त झलेला असून तांत्रीक स्वरुपाचा आहे. या प्रकरणी आरोपींना अद्याप८ अटक करण्यात आलेली नाही. पुढील तपास सुरु आहे. |
| २. | शिंदखेडा पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर १३०/२०१४, दिनांक १०.११.२०१४ भारतीय दंड विधान कलम ३५४, ३४१, ३२३, ५०६, ५०९ | आरोपीस दिनांक १०.११.२०१४ रोजी अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे. |
| ३. | शिंदखेड पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर १३१/२०१४, दिनांक १२.११.२०१४ भारतीय दंड विधान कलम ३५४, ५०४, ५०९ सह अनुसुचित जाती/जमाती प्रतिबंध कायदा ३ (१)(१०) | या प्रकरणातील आरोपी घटनेच्या दिवसापासून फरारी असल्यामुळे अद्याप त्यास अटक करण्यात आलेली नाही. साक्षीदार तपासणे व इतर तपास सुरु आहे. |
| ४. | शिंदखेड पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर १३५/२०१४, दिनांक १८.११.२०१४ भारतीय दंड विधान कलम ३५४, ४५२ सह बालकांचे अत्याचारापासून संरक्षण कायदा २०१२ कलम ३ व ७० | या प्रकरणात एकूण दोन आरोपी असून एका आरोपीस सी.आर.पी.सी. ४१ (अ) नुसार समज देण्यात आलेली आहे. अन्या आरोनीने मा.न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन मिळविलेला आहे. पुढील तपास सुरु आहे. |

| | | |
|---|---|---|
| ५ | नरडाणा पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ८७/२०१४ , दिनांक १४.११.२०१४ भारतीय दंड विधान कलम ३५४, ३२३, ५०४, ५०६, ३४ | सदर गुन्ह्यातील ४ आरोपींना अटक करुन न्यायालयात सादर केले असता आरोपींना न्यायालयाने जामीनावर मुक्त केले आहे. पुढील तपास सुरु आहे. |
| ६. | पिंपळनेर पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर १०३/२०१४, दिनांक १३.११.२०१४ भारतीय दंड विधान कलम ३५४ (अ) ४५२, ३४२, ५०६ | सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करुन न्यायालयात सादर केले असता आरोपीला न्यायालयाने जामीनावर मुक्त केले आहे. पुढील तपस सुरु आहे. |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील बोरीवली येथील नॅशनल पार्क, केतकी पाडा, जानूपाडा, लहूगड, दामूनगर येथील नागरिकांना मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(११) २४२४ (२३-१२-२०१४). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील बोरीवली येथील नॅशनल पार्क, केतकी पाडा, जानूपाडा, लहूगड, दामूनगर येथे वर्षानुवर्षे राहणा-या आदिवासी बांधवाना पिण्याचे पाणी, लाईट याची सोय उपलब्ध नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त सोयी - सुविधा मिळण्याकरिता संबधित अधिका-यांकडे वारंवार तक्रार करुनही कोणतीच कार्यवाही केलेली नाही हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आदिवासींना मूलभूत सोयी - सुविधा पुरविण्याच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आर/उत्तर विभागातील केतकीपाडा, दहिसर (पूर्व) या परिसराचा बहुतांश भाग हा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनहद्दीत येतो. केतकीपाडा परिसरास त्याच्या भौगोलिक परिस्थितीनुसार केतकीपाडा उद्चन संचाच्या स्वतंत्र व्यवस्थेद्वारा पुरेशा दाबाने पाणी पुरवठा करण्यात येतो. स्वतंत्र पाणी पुरवठा व्यवस्थेद्वारे साधारणत: २६५ जलजोडण्यांद्वारे सुमारे ३००० घरांना पुरेशा दाबाने पाणी पुरवठा करण्यात येतो. केतकीपाड्यातील अति उंचावर वास्तव्यास असलेल्या वनहद्दीतील पुनर्वसन पात्र रहिवाशांना त्यांचे पुनर्वसनापर्यंत नव्याने पाणी पुरवठा करणेबाबत मा.उच्च न्यायालयातील रिट पिटीशन

क्रमांक ३०५/१९९५, दिनांक ०३.१०.२००७ च्या आदेशांमध्ये आवश्यक सुधारणा करण्याविषयी महानगरपालिकेने सदर रिट याचिकेमध्ये नोटीस ऑफ मोशन क्रमांक ५५२/२०१४ दाखल केली असून, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या पुढील आदेशानुसार योग्य ती कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आर/दक्षिण विभागात असलेल्या जानूपाडा, लहूगड, दामूनगर येथे राहणाऱ्या रहिवाशांना पाणी पुरवठा सुरळीतपणे होत आहे. वनहद्दीतील अतिक्रमिकांना हटविणे/पुनर्वसन पात्र अतिक्रमिकांचे पुनर्वसन करणे इत्यादी बाबत मा.उच्च न्यायालयाच्या रिट पिटीशन क्रमांक ३०५/१९९५ मधील निर्देशनुसार, वनहद्दीतील अतिक्रमिकांना नव्याने सोयी-सुविधा देता येणे शक्य नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ऐरोली एम.आय.डी.सी. परिसरातील आदिवासी वस्त्यांमध्ये**
**नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१२) २४६५ (२२-१२-२०१४). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐरोली एम.आय.डी.सी. क्षेत्रातील इलठणपाडा, दिघा, चिंचपाडा, ऐरोली, गवतेवाडी, संभाजीनगर (कातकरीतपाडा) घणसोली, रबाळे, कातकरीपाडी, खैरण, अडवली, भूतवली या परिसरातील आदिवासी वस्त्यांमध्ये कोणत्याही स्वरुपाच्या नागरी सुविधा पुरविण्यात न असल्यामुळे आदिवासी कुटुंबिय अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदिवासी वस्त्यांमध्ये नागरी सुविधा त्वरित पुरविण्याबाबत शासन स्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१५) :**(१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबई विभागातील अतिउच्च दाबाच्या विद्युत वाहिन्यांखालील जागा नवी मुंबई**
**महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणेबाबत**

**(१३) २४६७ (२३-१२-२०१४). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई भेडसावीत असलेली पार्किंगची भीषण समस्या विचारात घेऊन या परिसरातील अति उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्यांखालील जागेचा वापर पार्किंगसाठी करण्याच्यादृष्टीने त्या जागा हस्तांतरीत करुन मिळाव्यात म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेने सिडको महामंडळाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको महामंडळाने उक्त भूखंड अद्यापि महानगरपालिकेकडे हस्तांतरीत न केल्यामुळे त्या जागांचा गैरवापर होत आहे यंची शासनाने तपासणी केली आहे काय असल्यास, तपासणीत काय आढळून आले व त्यानुसार भूखंड हस्तांतरीत करण्याबाबत शासन स्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) अद्यापी कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०७-२०१५) :**(१) व (२) होय, शासन आदेश दिनांक ६ जानेवारी, १९९४ अन्वये फक्त गार्डन, खेळाची मैदाने, शाळेसाठी व आरोग्य केंद्रासाठी राखीव असलेले भूखंड व सार्वजनिक उपयोगात येणारे भूखंड सदर आदेशातील अटी व शर्तीनुसार नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरण करावयाची कार्यवाही सुरु आहे. तथापि, त्यामध्ये उच्च विद्युत वाहिनीखालील भूखंड हस्तांतरण करण्याबाबत कोणतेही आदेश नाहीत.

उच्च विद्युत वाहिनीखालील भुखंडावर अनाधिकृत बांधकाम होऊ नये व नवी मुंबई क्षेत्रामध्ये हिरवळ टिकून रहावी म्हणुन त्या जागा प्रकल्पाग्रस्त, सार्वजनिक विश्वस्त संस्था व सहकारी गृह संस्था / संस्था, अथवा सहकारी गृहसंस्था यांना लिव्ह अॅन्ड लायसन्स पध्दतीने ठराविक कालावधीसाठी भाडेपटटयावर देण्याचे महामंडळाचे धोरण आहे. त्या धोरणानुसार महामंडळाचे उच्च विद्युतवाहिनीखालील भुखंड हे भाडेपट्टयाने दिलेले आहेत व बऱ्याच ठिकाणी गार्डन, नर्सरी विकसीत करण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबईतील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या वाहतुक आराखड्याची सद्य:स्थिती**

**(१४) २४७० (२३-१२-२०१४). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे सहज पोहचता यावे यासाठी “लि इंटरनॅशनल लिमिटेड कंपनीने” सिडकोला वाहतुक आराखडा सादर केला असूनही सिडकोने त्यावर अद्याप निर्णय घेतलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तावित विमानतळामुळे वाढणारी प्रचंड वाहतुक विचारात घेता वाहतुक आराखड्याबाबत तातडीने निर्णय घेण्याच्या दृष्टीने शासन स्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) अद्यापि कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास पर्यावरण व वन मंत्रालयाच्या मंजूरीनूसार, विमानतळासाठी, प्रादेशिक व स्थानिक परिवहन योजनांच्या अभ्यासासाठी मे.लि असोसिएटस साऊथ एशिया प्रा.लि.ची नेमणूक करण्यात आली. सर्व संबंधित प्राधिकरणांकडून अभिप्राय मागवून अंतिम अहवाल सर्व प्राधिकरणांना सिडकोद्वारे सादर करण्यात आला असून विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीसंदर्भात पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पिपंरी (जि.पुणे) येथील गरीबांसाठी वरदान ठरलेले महानगरपलिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात (वायसीएम) सद्य:स्थितीत अधिकारी व कर्मचारी यांचेवर कामांचा अधिक भार असल्याबाबत**

**(१५) २५१२ (२३-१२-२०१४). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिपंरी (जि.पुणे) येथील गरीबांसाठी वरदान ठरलेले महानगरपालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात (वायसीएम) सद्य:स्थितीत अधिकारी व कर्मचारी यांच्या रिक्त असलेल्या पदामुळे इतर कर्मचाऱ्यांवर कामांचा अधिक भार पडत असून अधिकारी व कर्मचारी वर्ग त्रस्त झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, रुग्णांना शस्त्रक्रिया व तपासण्या, सोनोग्राफी वगैरे आवश्यक त्या सुविधा वेळीच मिळण्याबाबत शासनाने तातडीने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :**(१) सदरचे म्हणणे अंशत: खरे आहे, कारण रुग्णालयात सद्या स्थायी आस्थापनेवरील ३६ वैद्यकीय अधिकारी आहेत, तसेच स्थायी वैद्यकीय अधिकारी आहेत. तसेच स्थायी आस्थापनेवरील नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले व राजीनामा दिलेले वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदी नव्याने नेमणुक करण्याची भरती प्रक्रिया चालू आहे. त्यामुळे त्वरीत वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करुन देता येत नाहीत. परंतू रुग्णालयातील रुग्णांची गैरसोय होवू नये म्हणून आवश्यक असणारी पदे ६ महिन्यांकरिता मानधनावर नेमली जातात व त्यांच्याकरवी कामे करुन घेतली जातात.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील पथदर्शी बीआरटी प्रकल्पातील त्रुटी दूर करण्याबाबत.**

**(१६) २५१५ (२३-१२-२०१४). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील पथदर्शी बीआरटी प्रकल्पात नियोजनाअभावी पुणे महानगरपालिका अयशस्वी झाली असून या अधिका-यांच्या मनमानी कारभारामुळे तसेच आवश्यक त्या नियोजनाअभावी आळंदी-नगर रोड सुरु होण्यास अजून किमान एक वर्ष लागणार असल्याचे माहे जुलै, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित बीआरटीतील त्रुटी दूर करण्यासाठी अधिका-यांकडे वारंवार पाठपुरावा केला असून प्रकल्पासाठी योग्य नियोजन करुन त्यानुसार आखणी करणे गरजेचे होते प्रकल्पांला वेळ झाल्यामुळे नागरिकांची गैरसोय झाली हे पाहता शासन चौकशी करुन दोषपितांवर कारवाई करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, या मागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५)** :(१) हे खरे नाही,

पुणे शहरामध्ये कात्रज-स्वारगेट व स्वारगेट-हडपसर या रस्त्याच्या दरम्यान पथदर्शी बी.आर.टी. प्रकल्प राबविण्यात आला होता. सदर पथदर्शी प्रकल्पातील आढळून आलेल्या त्रुटी विचारात घेऊन आळंदी बी.आर.टी.एस. मार्गाचे काम पूर्ण करणेत आले आहे. तसेच बी.आर.टी. बसेसचे प्रत्यक्ष संचलन सुरु करणेपूर्वीच्या मार्गाचे आय.आय.टी. पवई, मुंबई यांचे कडून रोड सेफ्टी ऑडीट करुन घेणेत आले आहे. रोड सेफ्टी ऑडीटमध्ये नमूद केलेल्या कामांची प्रत्यक्ष जागेवर पुर्तता करणेत आलेली आहे.

सदर रोडवरील आय.टी.एम.एस.यंत्रणा कार्यान्वित झालेनंतर माहे जून, २०१५ अखेर सदर मार्गावर बी.आर.टी. बसेसचे संचलन सुरु करणेबाबतचे नियोजन आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासींना शासकीय सेवेमध्ये समावून घेण्यासंदर्भात काढलेल्या अध्यादेशासंदर्भात

**(१७) २५४६ (२२-१२-२०१४). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बारा जिल्ह्यातील ५९ तालुक्यांतील आदिवासींना शासकीय सेवेत घेण्याबाबत मा.राज्यपालांनी आदेश काढण्यात येवूनही आदिवासींला शासकीय सेवेत नोकरी देण्याबाबत अद्यापी कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०८-०७-२०१५)** :(१) व (२) नाही, मा.राज्यपाल महोदयाच्या अधिसूचने नुसार रिक्त पदे भरण्याबाबतच्या सूचना व अनुसरावयाची कार्यपध्दती सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक दि.३१/०७/२०१४ आणि शासन निर्णय दि.०५/०३/२०१५ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरातील सायन येथे राहाणारे स्वामी नारायण सतवादी जेष्ठ नागरीकाची खंडणीसाठी अपहरण करुन हत्या केल्याबाबत**

**(१८) २६७२ (१५-०१-२०१५). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील सायन येथे राहाणारे व्यापारी स्वामी नारायण सतवादी या ६५ वर्षांच्या जेष्ठ नागरीकाची ३० लाखाच्या खंडणीसाठी दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा सुमारास अपहरण करुन हत्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी सायन पोलीस स्टेशन येथे गुरक्र.३४३/१४ भरारी कलम ३४२,३६५, ३८४, ३४ अन्वये दिनांक २९.१०.२०१४ रोजी दाखल करण्यात आलेला असून, सदरचा गुन्हा पुढील तपासाकरीता गुन्हे शाखा कक्ष-४, गुन्हे अन्वेषण विभाग, यांचेकडे वर्ग करण्यात आलेला आहे.

याप्रकरणी तीन आरोपीतांना अटक करण्यात आलेली असून अद्यापपावेतो केलेल्या तपासाच्या अनुषंगाने सदर गुन्ह्यात भादंवि कलम ३०२, २०१सह १२० (ब) ची वाढ करण्यात आलेली आहे.

सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे जुचंद्र येथील शासकीय जमिन वसई तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीस मिळणेबाबत**

**(१९) २७०३ (२२-१२-२०१४). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीने वसई तालुक्यातील मौजे जुचंद्र येथील स.नं. ९१,१२४,१२५,१२९ ही शासकीय जमीन मार्केट यार्ड साठी राखीव असणारी जमीन मिळण्याची मागणी सभापती कृषी उत्नन्न बाजर समिती ह्यांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०११ रोजीच्या निदेवनाद्वारे मा.महसूल मंत्री याच्याकडे मंजूरी साठी प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) विभागीय आयुक्त, कोकण विभाग ह्यांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०११ रोजीच्या पत्रान्वये प्रधान सचिव, महसूल यांचेकडे योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता करुन घेवून मंजूरी साठी प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तावाची सद्यस्थिती काय आहे,

(४) कृ.ऊ.बा. समितीस जमीन अद्यापपर्यंत न देण्यामागे शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०७-२०१५) :**(१), (२), (३) व (४) सभापती वसई कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी दि.१९/११/२०१० रोजीच्या निवेदनान्वये कृषी उत्पन्न बाजार समितीस जमीन मिळणेबाबत मागणी केली असून त्याअनुषंगाने विभागीय आयुक्त कोकण यांनी दि.२१/९/२०११ रोजीच्या पत्रान्वये प्रश्नाधि जमीन वसई तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीस देणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला होता, परंतू दि.२१/६/२०१२ रोजी मंत्रालयास लागलेल्या आगीमध्ये सदर प्रकरणाची नस्ती जळून नष्ट झाल्याने विभागीय आयुक्त कोकण यांनी पुनर्वबांधणी करुन प्रस्ताव सादर केलेला आहे. अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने सदर प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

---

**वसई तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत**

**(२०) २७०५ (१५-०१-२०१५). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.ठाणे) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे सहसंचालक, आरोग्य सेवा ह्यांनी दिनांक २५ जून, २०१३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.ठाणे ह्यांना वसई- विरार शहर महानगर पालिकेच्या ताब्यात देण्याबाबत स्वयंस्पष्ट अभिप्राय देण्याबाबत कळविले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबतचे अभिप्राय सादर करण्यात आले आहेत किंवा कसे,

(३) शासनाने ह्या प्रकरणी अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली अाहे वा करण्यात येत आहे,

(४) शासनाची भूमिका व सद्य:स्थिती काय?

**डॉ. दीपक सावंत (१०-०७-२०१५) :**(१) होय.

(२) (३) व (४) वसई विरार महागनरपालिका क्षेत्रात समाविष्ट झालेली वसई तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे महानगर पालिकेकडे हस्तांतरीत करण्यापूर्वी सदरची प्राथमिक आरोग्य केंद्रे तालुक्यामध्ये इतरत्र स्थलांतरीत करणे आवश्यक आहे. वसई विरार महानगरपालिका मध्ये समाविष्ट असलेली शासनाची प्राथमिक आरोग्य केंद्रे प्रथम कोणत्या ठिकाणी स्थलांतरीत करावी याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वसई यांचेकडून प्रस्ताव मागविण्यात आला आहे.

---

**कोल्हापूर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने जागेसाठी अर्ज स्विकारण्याबाबत**

**(२१) २८३५ (२२-१२-२०१४). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने जागेसाठी अर्ज स्विकारण्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान बंद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचा फटका औद्योगिक विकासाला बसला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे येथील उद्योगधंदे बाहेरच्या राज्यात जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाचे धोरण काय आहे?

**श्री. सुभाष देसाई (२२-०६-२०१५) :**(१) कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रामध्ये भूखंड वाटपास उपलब्ध नसल्यामुळे ऑनलाईन अर्ज स्विकृती सेवा बंद करण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रात उद्योजकांना भूखंड वाटपास उपलब्ध नसल्यामुळे महामंडळाने करवीर व अर्जुनी, ता.कागल येथे नविन औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

तसेच राज्यात शासनाने नविन सामुहिक प्रोत्साहन योजना, २०१३ लागू केली असून, त्याअनुषंगाने विहीत उद्योग घटकांना अनुदान व सवलती अनुज्ञेय करण्यात आल्या आहेत.

---

**कुंभोज (जि.कोल्हापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी जागा उपलब्ध होऊनही आरोग्य केंद्राची उभारणी करण्यात न आल्याबाबत.**

**(२२) २८४१ (१५-०१-२०१५). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंभोज (जि.कोल्हापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी जागा उपलब्ध होऊन आठ वर्षे झाली तरी अद्यापही या आरोग्य केंद्राची उभारणी करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या आरोग्य केंद्राची उभारणीस विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरचे आरोग्य केंद्र केव्हापर्यंत पूर्ण होणे शासनास अपेक्षित आहे ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०६-२०१५) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

शासन निर्णय दि.१७.०१.२०१३ अन्वये मान्य बृहत आराखड्यानुसार कुंभोज, जि.कोल्हापूर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापनेस मंजुरी देण्यात आली आहे. या अनुषंगाने जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी दि.१३.०८.२०१४ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना नियोजित प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारत व इतर बांधकामाचे सुधारित नमुना नकाशानुसार अंदाजपत्रक सादर करणेबाबत कळविले आहे.

---

**वैभववाडी तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) उवडे नावडे आरोग्य केंद्रवापराविना असल्याबाबत.**

**(२३) २८८८ (१५-०१-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) उवडे नावडे आरोग्य केंद्र गेली तीन वर्षे पूर्ण होऊनही वापराविना पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या केंद्राचा ताबा आरोग्य विभागाला देण्यास विलंब केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत (३०-०६-२०१५) :**(१), (२) व (३) हे खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आरोग्य व उपकेंद्र उबर्डेच्या इमारतीचे बांधकाम दि. ५.०३.२०१३ रोजी पूर्ण झाले असुन या इमारतीच्या बांधकामातील शौचालयाच्या सेप्टीक टँकबाबत स्थानिक नागरिकाने उपअभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, कणकवली, जि.सिंधुदुर्ग यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. यामुळे सदर इमारत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग यांच्या ताब्यात देण्यात आलेली नाही.

---

**मुंबई उपनगरातील बोरिवली - पश्चिम डोंगराखाली सि, सर्व्हे क्र. ३७१ ला भूखंड उद्यानासाठी राखीव असतांना त्यावर ५००० चौ. फूटाचे पक्के बांधकाम कंत्राटदाराने केले असून गाळे तडकाफडकी विक्री केले असल्याबाबत**

**(२४) २९०७ (२३-१२-२०१४). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील बोरिवली - पश्चिम डोंगराखाली सि, सर्व्हे क्र. ३७१ ला भूखंड उद्यानासाठी राखीव असतांना त्यावर ५००० चौ. फूटाचे पक्के बांधकाम कंत्राटदाराने केले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटदाराने व्यावसायिक गाळे बांधून तडकाफडकी विक्री केल्याचेही निदर्शनास झाले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आर/मध्य महानगरपालिका इमारत व कारखाने खात्याचे सहायक अभियंता सतिश घोणे यांचे कंत्राटदारांशी संगनमत असल्याने तक्रार करुनही कोणतीच कारवाई करीत नाही हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, चौकशीनुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५)** :(१) सदर भूखंडावार ६८'-६ x २८'-६ आकाराचे एकूण ६ रुमचे १९५२ चौ.फुटांचे बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सदर बांधकामास बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या नोटीशीनुसार सदर बांधकाम एकूण ६ रुमचे असुन स्थळनिरीक्षणादरम्यान सदरची बांधकामे ही व्यावसायिक वापराकरिता नसून त्याचा निवासी वापर केल्याचे आढळून आले.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी प्रस्तावित केली आहे. चौकशीच्या अंतिम अहवालानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

---

**मुंबईतील बंद पडलेली खटाव मिल एका बडया उद्योग समूहासह स्वयंम डेव्हलपर्स यांनी विकत घेतल्याबाबत**

**(२५) २९१३ (२३-१२-२०१५). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बंद पडलेली खटाव मिल एका बडया उद्योग समूहावर स्वयंम डेव्हलपर्स यांनी विकत घेतली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालिकेच्या मालकीच्या भाडेपट्टा भूखंड नावावर करुन घेतला नसतांनाही इमारत उभारणीसाठी परवानगी मिळविल्याचे उघड झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, इमारत प्रस्ताव विभागाचे अधिकारी यांनी यात भ्रष्टाचार केल्याचे उघडकीस आले आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, संबधित अधिका-यांवर तसेच स्वयंम डेव्हलपर्सवर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५)** :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील पोलीस पाटलाची सुमारे १३ हजार पदे रिक्त असल्याबाबत**

**(२६) २९४७ (१५-०१-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस पाटलाची सुमारे १३ हजार पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :**(१) राज्यातील पोलीस पाटलांची १५,५५२ पदे रिक्त आहेत.

(२) शासनाने दुष्काळ निवारणाच्या कामाकरीता दि. २५.२.२०१३ च्या पत्रान्वये पोलीस पाटील भरती प्रक्रियेस स्थगिती देण्यात आली होती. तसेच, लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक निवडणुकांच्या आचारसंहिता, आरक्षण सुधारीत बिंदुनामावली तयार करणे, पोलीस पाटलांची सेवानिवृत्ती/राजीनामा इत्यादी कारणामुळे पोलीस पाटलांची पदे रिक्त राहीली आहेत.

(३) दि. २७८.२०१४ च्या पत्रान्वये पोलीस पाटलांच्या भरती प्रक्रियेवरील स्थगिती उठविण्यात आली असून, राज्यातील पोलीस पाटलांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय नेत्र रुग्णालय परभणी काहीही सुविधा व यंत्रणा उपलब्ध नसतानाही उद्घाटन करुन सुरु करण्यात आल्याबाबत**

**(२७) २९५४ (२३-१२-२०१४). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील शासकीय नेत्र रुग्णालय मागील महिन्यापूर्वी काहीही सुविधा व यंत्रणा उपलब्ध नसतानाही उद्घाटन करुन सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामध्ये यंत्रणा व सुविधा उपलब्ध नसताना त्याचे उद्घाटन का करण्यात आले याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने आवश्यक यंत्रणा व सुविधा उपलब्ध करण्याकरिता कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दिपक सावंत (३०-०६-२०१५) :**(१), (२) व (३) जिल्हा रुग्णालय, परभणी येथील नेत्र शस्त्रक्रिया गृहामध्ये किरकोळ दुरुस्त्या करण्याच्या प्रस्तावित होत्या दरम्यान अग्निशमन विभागाने वापरास परवानगी दिल्याचे या इमारतीच्या उद्घाटनाचा कार्यक्रम दि.१३.०८.२०१४ रोजी पार पडला. तद्नंतर आजपर्यंत येथील ओ.पी.डी. सुरु असून नेत्र विकार झालेल्या ४८,९७० इतक्या रुग्णांना सेवा देण्यात आल्या आहेत. नेत्र विभागात आवश्यक तिथे किरकोळ दुरुस्ती करण्यात येत असून सदर काम पूर्ण झाल्यानंतर नेत्र विभाग पूर्णत: कार्यान्वित होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्ह्यातील चुरमापुरी येथील अनिल चौधरी या इसमाचा झालेला खून**

**(२८) ३१०२ (१५-०१-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील चुरमापुरी येथील अनिल अप्पासाहेब चौधरी या इसमाचा दिनांक १५ नोव्हेंबर, २०१४ रोजी खून झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्था, चोरी, दरोडे यांच्यात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) :**(१) होय,

(२) जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला नाही. सन २०१३ तुलनेत सन २०१४ मध्ये चोरीच्या गुन्ह्यात वाढ झाली असली तरी गुन्हा उघड केल्याचे प्रमाण जास्त आहे. तसेच दरोड्याच्या गुन्ह्यात घट झाली असून सर्वच्या सर्व १० गुन्हे उघड केलेले आहेत.

(३) प्रश्न भाग १ मध्ये नमूद प्रकरणात पोलीस स्टेशन गोंदी, जि.जालना येथे गु.र.नं. १७७/२०१४ कलम ३०२, २०१, १२० (ब) भा.द.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करुन आरोपींना अटक करुन पोलीस कोठडी घेऊन तपास करण्यात आला आहे. प्रकरणी मा.न्यायालयात दोषारोप दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

चोरी दरोड्या सारखे गुन्हे घडू नये म्हणून प्रभाव ग्रस्त भागात जास्तीची रात्रगस्त व जीप पेट्रोलिंग नेमण्यात आलेली असून गुन्हे उघडकीस आणण्यासाठी विशेष पथके नेमून गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण वाढविण्यात आले असून प्रयत्न चालू आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

---

**चिपळूण नगरपालिकेने (जि.रत्नागिरी) अधिकृत कंपनीच्या नावे बनावट देयके सादर करुन बँक खात्यावर धनादेश वटवून लाखोंची फसवणूक केल्याबाबत**

**(२९) ३१६१ (२३-१२-२०१४). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण नगरपालिकेने (जि.रत्नागिरी) अधिकृत कंपनीच्या नावे बनावट देयके सादर करुन बँक खात्यावर धनादेश वटवून लाखोंची फसवणूक केल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संबंधित कंपनी /पुरवठादार यांचे निदर्शनास येताच त्यांनी याबाबत तक्रार नोंदवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने दोषींवर कोणती कार्यवाही केली आहे वा करणेत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१५)** :(१) नाही.

(२), (३), (४) व (५) मे, युनियन ट्रेडर्स यांनी नगरपरिषदस पुरविलेल्या बांधकाम साहित्य बीलाचा धनादेश त्यांच्या खात्यात जमा न झाल्यामुळे मे. युनियन ट्रेडर्सचे मालक यांनी अज्ञात इसमाविरुध्द पोलीस स्टेशन चिपळून येथे पुन्हा नोंद केला असून या गुन्हयांचा तपास सुरु आहे.

---

**पालघर जिल्हयातील सुर्या धरणातले पाणी मीरा-भाईंदर शहराला पुरवठा करण्याबाबत.**

**(३०) ३१८२ (२३-१२-२०१४). श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एमएमआरडीएच्या माध्यमातून एमएमआरडीए कोटयातील पालघर जिल्हयातील सुर्या धरणातले २०० एम.एल.डी. पाणी तसेच शासनाच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मोफत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा सुर्या धरणातून मीरा - भाईदर शहराला करण्याचे काम एमएमआरडीए मार्फत केले जाणार आहे, हेही खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण ३०० एम.एल.डी. पाणी पुरवठा सुर्या धरणातून मीरा - भाईदर शहराला करण्याचे काम एमएमआरडीए मार्फत केले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पाणीपुरवठा करण्याचे निकष काय आहे आणि किती कालावधीत हे काम सुरु होणार आहे, आणि केव्हा पूर्ण होणार आहे,

(४) असल्यास, सदर पाण्याचे दर प्रती हजार लीटर किती असणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०७-२०१५)** :(१) व (२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या प्रस्तावित ४०३ द.ल.ली. प्रतिदिन सुर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतून मिरा-भाईदर शहरास जलसंपदा विभागाच्या कोट्यातून १०० द.ल.ली असे एकूण घाऊक प्रमाणातील पाणी पुरवठा २१८ द.ल.ली प्रतिदिन इतका असणार आहे.

(३) व (४) प्राधिकरणाने सुर्या पाणीपुरवठा योजनेतील पाणी वाटपास मिरा-भाईंदर महानगरपालिकेस २१८ द.ल.ली. अशी मान्यता दिली असून सदर योजना राबविण्याकामी विविध परवाने प्राप्त करण्याची कामे प्रगतीपथावर असून परवाने प्राप्त होताच निविदा मागवून मते २०१६ मध्ये हाती घेण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर नियोजित असून सदर योजना कार्यान्वित करण्याचा अंदाजित कालावधी ३४ महिन्याचा आहे.

---

## ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर येथील मे.स्वी.ग्रुप या विकासकाने मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम केले असल्याबाबत

**(३१) ३१९६ (२३-१२-२०१४). श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर येथील मे.स्वी.ग्रुप या विकासकाने मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम केले असल्याचे तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाच्या निदर्शनास आणून देण्याकरिता दिनांक १९ नोव्हेंबर, २०१४ च्या पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने वरील प्रकरणी चौकशीचे अथवा कारवाईचे आदेश संबंधित विभागास दिले आहे काय तसेच त्यावर काय कारवाई करणार आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०७-२०१५) :**(१) होय.
(२) मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दिलेल्या परवानगी व्यतिरिक्त मे.रवी ग्रुप या विकासकाने केलेल्या वाढीव बांधकामाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई तालुकयातील मच्छिमार बांधवाच्या अडी अडचणींबाबत

**(३२) ३२२२ (२२-१२-२०१५). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तालुकयातील मच्छिमार बांधवांच्या समस्यांबाबतचे निवेदन दिनांक ६ ऑगस्ट, २०१४ रोजी किंवा त्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मत्स्यव्यवसाय मंत्र्यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत निवेदनाबाबत शासनाने अद्यापपर्यंत काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास याची, सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०६-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) सदर निवेदनातील अर्नाळा बंदरात टॉवर लाईटची व्यवस्था करणे, बंदरावर असलेल्या दिपगृहाची उंची वाढवणे, अर्नाळा बंदरात मालवाहू बोटीच्या मूळ होणारे अपघात टाळण्यासाठी अत्याधुनिक यंत्रसामुग्री उभी करणे या मुद्यांच्या अनुषंगाने महाराष्ट्र मेरीटाईम

बोर्ड विभागास निर्देश दिले आहेत. तसेच अर्नाळा गावातील गावठान जागा व मच्छिमार बांधवांच्या रहात्या घरांच्या जागा त्यांच्या नावावर करणे या मुद्याबाबत महसूल विभगाने संबंधितांची बैठक आयोजित केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्हयातील आदिवासी विद्यार्थ्यांना आर्थिक क्षमतेच्या कारणास्तव उच्च शिक्षण घेता येत नसल्याबाबत

**(३३) ३२३० (२२-१२-२०१४). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवनिर्मित पालघर जिल्हयातील पालघर, डहाणू, तलासरी, जव्हार, मोखाडा आणि विक्रमगड येथील आदिवासी विद्यार्थी व विद्यार्थीनींचा आर्थिक क्षमतेअभावी घराबाहेर राहून उच्च शिक्षण घेणे शक्य होत नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विद्यार्थ्यांना वसतीगृहाची व्यवस्था करुन दिल्यास त्यांचा शिक्षणाचा मार्ग मोकळा होऊ शकतो हे लक्षात घेऊन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ जुलै,२०१४ रोजीच्या निवेदनाव्दारे मा. आदिवासी विकास मंत्री महोदयांकडे गाव मौजे निळेमोरे, ए.नं ९७ अ मध्ये १००० विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह बांधण्याची मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणी काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर प्रस्तावाची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (०६-०६-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) मा.विधानसभा सदस्य श्री. क्षितीज ठाकूर यांनी दिनांक १ ऑगस्ट, २०१४ च्या पत्रान्वये मौजे निळेमोरे येथील सर्व्हे नं. ९७अ मधील जागेत विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह बांधण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे.

(३) व (४) जिल्हाधिकारी, पालघर यांच्या दिनांक १ जानेवारी, २०१५ च्या आदेशान्वये आदिवासी मुलां/मुलींचे शासकीय वसतीगृह बांधणेकामी मौजे निळेमोरे, ता.वसई येथील ०.५० हे.आर जमिनीचा आगवू ताबा आदिवासी विकास विभागास देण्यात आलेला आहे. सदर जागा आदवासी विभागाचे नावावर केलेबाबत ७/१२ उतारा, ताबा पावती इ.कागदपत्रे प्राप्त करुन सादर करणेबाबतच्या सूचना अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांनी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू यांना दिनांक १७ मार्च, २०१५ च्या पत्रान्वये दिलेल्या आहेत. याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**मुंबईतून बेपत्ता होणा-या मुला-मुलींच्या संख्येत वाढ झाल्याबाबत.**

**(३४) ३२६१ (२३-१२-२०१४). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतून सन २०११ ते २०१३ या तीन वर्षाच्या कालावधीत बेपत्ता झालेल्या जवळपास ७०० मुलांचा शोध लावण्यास पोलिसांना अद्याप यश आले नाही, अशी माहिती माहितीच्या अधिकारातून दिनांक ४ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील काही वर्षात मुंबईतून बेपत्ता होणा-या मुला-मुलींच्या संख्येत वाढ झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्याप शोध न लागण्याची कारणे काय या मुलांचा शोध लावण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.

सन २०११ ते २०१३ या तीन वर्षाच्या कालावधीत एकूण १०१७६ मुले व मुली हरविलेले आहेत. त्यापैकी ८८६६ मुले मुली सापडलेले असून उर्वरित १३१० जणांचा शोध घेण्यात येत आहे.

(३) (१) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अधिपत्याखालील बृहन्मुंबईतील सर्व पोलीस ठाणेत हरविलेल्या व्यक्तींची/मुलांचा शोध घेण्याकरीता विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.

(२) हरविलेल्या मुलांचा शोध घेण्यासाठी पोलीस नियंत्रण कक्षाकडून बिनतारी संदेश प्रसारीत करुन तसेच पोलीस परिपत्रकात प्रसिध्दी देऊन हरविलेल्या मुलांचा शोध घेण्यासाठी सर्व पोलीस ठाणेंना अवगत करण्यात येते.

(३) हरविलेल्या मुलांच्या शोधासाठी दुरदर्शनवर फोटो प्रसिध्द करण्याकरिता पाठविले जातात व फोटो प्रसिध्द झाल्याची खात्री केली जाते.

(४) हरविलेल्या मुलांच्या शोधासाठी बृहन्मुंबईतील सर्व सुधारगृहातून शोध घेतला जातो.

(५) लहान मुलांच्या शोधासाठी सामाजिक संस्था यांची मदत घेतली जाते.

(६) या कार्यालयाकडून हरविलेल्या मुलांची गॅझेटमध्ये प्रसिध्दी केली जाते.

(७) प्रत्येक पोलीस ठाणे स्तरांवर अधिकारी व अंमलदार यांचे विशेष पथक स्थापन करण्यात आले असून हरविलेल्या मुलांचा शोध घेण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील खिडकाळी तलावाच्या सुशोभीकरणाच्या कामात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याबाबत**

**(३५) ३३२३ (२३-१२-२०१४). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील खिडकाळी तलावाच्या सुशोभिकरणाचे काम करणाऱ्या गगनगिरी कंन्स्ट्रक्शन कंपनीने निकृष्ट दर्जाचे काम केल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकाराची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि दोषींवर शासनाकडून आजतागायत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१५) :**(१) अशा आशयाची तक्रार ठाणे महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कौसा कबरस्थान ते सिमलापार्क हा परिसर नो पार्कींग झोन करण्याबाबत**

**(३६) ३३२७ (२३-१२-२०१४). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कौसा कबरस्थान ते सिमला पार्क या परिसरात अनेक खाजगी रुग्णालये, शाळा महाविद्यालये तसेच कबररस्थान असूनही सदर परिसरातील रस्त्यांवर बेकायदेशीर रित्या दुतर्का गाड्या उभ्या केल्या जात असल्याने सद्य:स्थितीत विद्यार्थ्यांची व रुग्णाची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कौसा कबरस्थान ते सिमला पार्क हा परिसर नो पार्कींग झोन करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) सदरील रस्त्यावर महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-
(i) नो पार्किंगचे फलक लावण्यात आलेले आहेत.
(ii) सदर ठिकाणी वाहनांवर नियमितपणे कारवाई करुन वाहतूक व्यवस्था सुस्थितीत ठेवणेसाठी वरिष्ठ पोलीस निरिक्षक, वाहतुक पोलीस शाखा, मुंब्रा यांना दिनांक १६.१.१५ अन्वये कळविण्यात आले आहे.
(iii) ठाणे महानगरपालिकेने पार्किंग धोरणाची अंमलबजावणी करणेसाठी प्रत्येक प्रभाग समितीमध्ये पार्किंग झोन तयार करणेसाठी रस्त्यांची निवड व पार्किंगची क्षमता संबंधित प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त व कार्यकारी अभियंता यांचेमार्फत करण्यात आली आहे. सर्व प्रभाग समितीकडील प्रस्तावित पार्किंगचे संकलन करण्यात आले असून त्यानुसार पार्किंगचे धोरण तयार करण्यात आले आहे.

(iv) सदर पार्किंग धोरणास ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र.०७ दिनांक १७.४.२०१३ अन्वये मान्यता दिली आहे. तथापि, प्रशासनाने निश्चित केलेल्या पार्किंगच्या दरापेक्षा कमी दर सर्वसाधारण सभेने प्रस्तावित केले आहेत. सर्वसाधारण सभेने प्रस्तावित केलेले दर सर्वपक्षीय गटनेत्यांच्या समवेत महापौर यांचे दालनामध्ये निर्णय घेण्यात यावा, सदर निर्णयास अधिन राहून सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे. त्यानुसार पार्किंग धोरणाची अंमलबजावणी करणेची काग्रवाही सुरु आहे.

मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रात पार्किंग क्षेत्र प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डोंबिवली (जि.ठाणे) येथील निळजे व आजदे प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या १६ गावातील उपकेंद्रांसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३७) ३३३३ (२३-१२-२०१४). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील निळजे व आजदे प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या १६ गावातील उपकेंद्रांसाठी स्वत:ची जागा नसल्याने जिल्हा परिषदेच्या शाळांच्या आवारात सदर उपकेंद्र कार्यान्वित असल्याने कर्मचारी रुग्णांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू उपकेंद्रासाठी तातडीने जागा उपलब्ध करुन देण्याबात शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०६-२०१५) :**(१) व (२) हे अंशत: खरे आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र निळजे अंतर्गत ५ उपकेंद्रे असून त्यापैकी २ उपकेंद्रे स्वत:च्या इमारतीत कार्यरत आहे. अन्य २ उपकेंद्रासाठी जागा मिळवण्यासाठी संबंधितांबरोबर पत्रव्यवहार सुरु आहे. एका उपकेंद्राकरीता शहरीकरणामुळे जागा उपलब्ध नाही. प्राथमिक आरोग्य केंद्र आजदे अंतर्गत ७ उपकेंद्राबाबतचा प्रस्ताव वनविभागाकडे पाठविण्यात आलेला आहे. उर्वरित ४ उपकेंद्रासाठी शहरीकरणामुळे जागा उपलब्ध नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**पुणे महानगर परिवहन महामंडळ (PMPML) या सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेकरीता आवश्यक बसेस ची संख्या कमी असल्याने भाडेतत्वावर बस मिळणेकरीता महानगरपालिकेने ठेकेदाराकडून निविदा मागविल्या असल्याबाबत**

**(३८) ३३७३ (२३-१२-२०१४). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर परिवहन महामंडळ (PMPML) या सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेकरीता आवश्यक बसेसची संख्या कमी असल्याने भाडेतत्वावर बस मिळणेकरीता महानगरपालिकेने ठेकेदाराकडून निविदा मागविल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निविदा अटी नुसार सदरहू भाडेतत्वावरील बसेस करारानुसार १२० दिवसात महामंडळास देणे आवश्यक असताना ठेकेदाराच्या सोयीनुसार बस उपलब्ध करुन दिल्या जात आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विहित वेळेत बसेस महामंडळाच्या न दिल्याने केवळ एकाच ठेकेदाराचा ठेका रद्द का करण्यात आला, हे खरे आहे का,

(४) असल्यास, उक्त प्रश्नी महामंडळाचा प्रति दिन लाखो रुपयांचे नुकसान होत असतांना कोणती कार्यवाही केली जात आहे,

(५) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) :**(१) होय,

(२) अंशतः खरे आहे. ज्या ठेकेदारांकडून करारानुसार बस उपलब्ध झाल्या नाहीत त्यांचेवर महामंडळाकडून दंडात्मक करण्यात आली आहे.

(३) व (४) बस पुरवठ्याच्या अट क्र.३३ नुसार १२० दिवसांत बसेसच्या पुरवठा महामंडळास करणे आवश्यक होते. तथापि मे. जय सोमनाथ ट्रान्सपोर्ट कॅरियर्स यांनी १२० दिवसांच्या मुदतीत व वाढवून दिलेल्या १५ दिवसांच्या मुदतीत म्हणजेच १३५ दिवसांमध्ये एकाही बसचा पुरवठा महामंडळास उपलब्ध करुन दिला नाही. याबाबत संबंधित ठेकेदारास कायदेशीर नोटीस देण्यात आली. निविदा रद्द करणेकामी सादर केलेल्या विषयपत्रावर मा.संचालक मंडळाने मे.जय सोमनाथ ट्रान्सपोर्ट करियर्स यांची निविदा रद्द करण्यास ठराव क्र.१०६, दिनांक २८.२.२०१४ अन्वये मान्यता दिली. या मान्यतेच्या दिनांकापर्यंत अखेर संबंधित ठेकेदाराची एकही बस महामंडळास उपलब्ध न झााल्याने त्यांची निविदा रद्द करण्यात आली.

ज्या ठेकेदारांकडून करारानुसार बस उपलब्ध झाल्या नाहीत त्यांचेवर महामंडळाकडून दंडात्मक झाल्या नाहीत त्यांचेवर महामंडळाकडून दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई-विरार (जि.ठाणे) महापालिकेच्या प्रभाग ड समितीच्या अंतर्गत येणा-या दिवाणमान येथील नाल्यांचे रुंदीकरण आणि सफाई करण्याबाबत**

**(३९) ३५५३ (२३-१२-२०१४). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई - विरार (जि. ठाणे) महापालिकेच्या प्रभाग ड समितीच्या अंतर्गत येणा-या दिवाणमान येथील नाल्यांचे रुंदीकरण आणि सफाई करण्यासाठी मे. शिवशंभू ट्रेडर्स यांना एक कोटी रुपयांचा ठेका देण्यात आला होता हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठेकेदाराचे वाढीव खर्च म्हणून ३१ लाख ६६ हजार ५७६ रुपयांचे बिल सादर करुन दिनांक १९ नोव्हेंबर, २०१४ च्या सुमारास मंजूरही करण्यात आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या ठेकेदाराने नालेसफाई न करताच तसेच वाढीव कोणतीच कामे केली नसतांनाही सदरचा वाढीव खर्च घेण्यात आला आहे हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१५) :**(१) होय.

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "ड" विभागातील १७ नाले रुंद करणे, गाळ काढणे, सफाई करण्याकामी आवश्यकतेनुसार मशिनरी पुरविण्याकामी रितसर निविदा मागवुन प्रभाग समिती "ड" विभागातील ठेका मे.शिवशंभू ट्रेडर्स, धानीव यांना देण्यात आला होता. यामध्ये दिवाणमान येथील सनसिटी पोलीस चौकी ते भवानी मंदिर रोड पर्यंत या नाल्याच्या सफाई कामाचा समावेश आहे.

(२) होय.

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग "ड" समिती अंतर्गत येणाऱ्या मोठ्या प्रमाणात रुंद व खोल करण्यात आले असून काढलेला गाळ वाहतुक करुन गास-चुळणा रस्त्यालगत तसेच गोखिवरे डंम्पिंग ग्राऊंडवर टाकुन पसरविण्यात आला. त्यासाठी पुरवठा केलेली मिशनरी वाहने मंजुर निविदेप्रमाणे प्रतीतास/प्रतिदिन या प्रमाणे लॉग बुकात नोंदी घेऊन बिल अदा करण्यात आलेले आहे. एकूण झालेल्या बिलापैकी खर्च रुपये ३१,६६,५७६/- ला महासभेने ठराव क्र.७, दिनांक १९.११.२०१४ ने प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिल्यानंतर बिल अदा केलेले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे पोलीस आयुक्त कार्यालयाच्या हद्दीत जानेवारी ते ऑक्टोबर, २०१४**
**या कालावधीत ५०७ मुली व २७५ मुले हरवल्याबाबत**

**(४०) ३५७६ (१५-०१-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे पोलीस आयुक्त कार्यालयाच्या हद्दीत जानेवारी ते ऑक्टोबर, २०१४ या कालावधीत ५०७ मुली व २७५ मुले हरवली आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच वरील पैक्की १५१ मुली व ७३ मुलांचा अद्यापही शोध लागलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रचंड प्रमाणात मुले हरवण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, बेपत्ता मुलांचा शोध लावण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) :**(१) होय, हे अंशतः खरे आहे.

ठाणे पोलीस आयुक्तालायचे हद्दीत जानेवारी ते ऑक्टोबर २०१४ या कालावधीत ५२७ मुली हरवलेल्यं असून २९२ मुले हरलेली आहेत.

(२) हे खरे नाही. उपरोक्त हरवलेल्या ५२७ मुलींपैकी ४९२ मुली मिळून आल्या असून ३५ मुली अद्यापही मिळन आलेल्या नाहीत. त्याचप्रमाणे हरवलेल्या २९२ मुलांपैकी २७१ मुले मिळन आलेली असून २१ मुले अद्याप मिळणे बाकी आहेत.

(३) बरीचशी लहान मुले ही मित्रांचे संगतीमुळे, घरात काहीएक नसांगता, नातेवाईकांकडे मित्रमैत्रिणींकडे फिरायला जाणे, घरगुती भांडणामुळे रागात घर सोडून जाणे, अभ्यासाला कंटाळून, पालकांना घाबरुन घरातून निघुन गेल्याने मिसींग दाखल झालेल्या आहेत.

(४) बेपत्ता मुलाचा शोध लावण्याकरीता पोलीस ठाणे स्तरावर स्वतंत्र पथके तयार करण्यात आलेली असून सदर पथकामार्फत शोध घेण्यत येत आहे. त्याचप्रमाणे ठाणे पोलीस आयुक्तालयात बालकांचे संरक्षण करण्याकरीता (child protection) स्वतंत्र बालसंरक्षण पथक तैनात करण्यात आलेले असून सदर पथकाकडून हरविलेल्या बालकांच्या कसोशीने शोध घेतला जात आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालोंड -मालडी (पाणवठा) (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथे गडनदीवरील**
**कोकण पध्दतीचा बंधारा बांधण्याबाबत**

**(४१) ३६१७ (२३-१२-२०१४). श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालोंड -मालडी (पाणवठा) (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथे गडनदीवरील कोकण पध्दतीचा बंधारा बांधण्यात यावा म्हणून तेथील ग्रामस्थांनी मागील सुमारे २५ वर्षापासून सातत्याने मा.पालकमंत्री, मा.जलसंपदा मंत्री, सचिव, जलसंपदा विभाग, कार्यकारी संचालक, कोकण

पाटबंधारे महामंडळ, ठाणे आदींकडे मागणी केल्यानंतर कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांनी त्यांचेकडील पत्र क्र.कोपविम/तां १/मालोंड मालडी/प्रमा/११२३/२०११ दिनांक १६ मार्च, २०११ रोजी सचिव जलसंपदा विभग यांचेकडे सदरहू बंधा-याच्या रुपये ३४२.०५ इतक्या किंमतीच्या अंदाजपत्राकास प्रशासकीय मान्यता मिळावी म्हणून प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाच्या मंजूरीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आसहे,

(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१५) :**(१) व (२) होय.

मालोंड-मालडी (पाणवठा) (ता.मालवण, जि. सिंधुदुर्ग) येथील गडनदीवरील २४७ हेक्टर सिंचन क्षमतेच्या कोकण पध्दतीच्या बंधाऱ्यास रुपये ३४२.०५ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांनी प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केलेले होते. या बंधाऱ्याची हेक्टर सिंचन क्षमता २५० पेक्षा कमी असल्याने बंधाऱ्याचे हस्तांतरण महाराष्ट्र जलसंधारण महामंडळास दिनांक १२ डिसेंबर, २०१३ चे पत्रान्वये करण्यात येऊन रुपये ४८.८७ लक्ष इतक्या रकमेच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. निधी उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कणेरी (ता.भिवंडी जि.ठाणे) येथील सर्व्हे क्र.२३/१/ब,सर्व्हे क्र.१९/३ सर्व्हे क्र. १९/१,सर्व्हे क्रमांक १८/१, व आणि सर्व्हे क्र. १८/२ अ-१ या जमिनी मिळकतीबाबत**

**(४२) ३६९१ (२२-१२-२०१४). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कणेरी (ता.भिवंडी जि.ठाणे) येथील सर्व्हे क्र.२३/१/ब,सर्व्हे क्र.१९/३ सर्व्हे क्र. १९/१,सर्व्हे क्रमांक १८/१, व आणि सर्व्हे क्र. १८/२ अ-१ या जमिनी मिळकतीबाबत श्री.श्रीकांत वंसत जाधव रा. न्हावीपाडा ता.भिवंडी,जि.ठाणे यांनी मा.महसूल मंत्री यांचेकडे दिनांक १६ मे,२०१३ राजी वा त्यासुमारास अर्ज सादर केला हे खरे आहे काय,

(२) तसेच मा.महसुल मंत्री यांचे दिनांक १ जुलै, २०१४ रोजीचे आदेश भिवंडी तहसिलदार कार्यालयात दिनांक २ ऑगस्ट, २०१४ रोजी प्राप्त झाले हे खरे आहे काय,

(३) तसेच माहे ऑक्टोबर, २०१४ अखेरपर्यंत भिवंडी तहसिलदार यांनी कोणतीच कारवाई न केल्याने अर्जदार श्री.जाधव यांनी दिनांक १७ नोव्हेंबर, २०१४ रोजी मा.मुख्य सचिव, प्रधान सचिव (महसुल), कोकण विभाग, आयुक्त यांचेकडे भिवंडी तहसिलदारांची चौकशी करण्याची मागणी पत्राव्दारे केली हे खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०६-२०१५) :**(१) मौजे कणेरी, ता.भिवंडी जि.ठाणे येथील सर्व्हे क्र. २३/१/१ व इतर मिळकतीबाबत श्रीमती भागिरथी मदन जाधव व इतर यांनी श्री. लक्ष्मण कान्हा जाधव व इतर यांचेविरुध्द मा.मंत्री (महसूल) यांच्या न्यायालयात दिनांक १६ मे, २०१३ रोजी अपील दाखल केले होते. सदर अपिलात श्री.श्रीकांत वसंत जाधव यांचेही नाव प्रतिवादी म्हणून सामील होते.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४), (५) व (६) श्री.श्रीकांत वसंत जाधव यांच्या दिनांक १७ नोव्हेंबर, २०१४ च्या अर्जाच्या अनुषंगाने चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१५ च्या शासन पत्रान्वये जिल्हाधिकारी ठाणे यांना कळविले आहे.

---

## राज्यातील पोलीसांच्या कुटुंब कल्याण केंद्राच्या प्रगतीची सद्य:स्थिती

**(४३) ३८३४ (१५-०१-२०१५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पोलीसांच्या कुटूंबाच्या कल्याणाकरिता पोलीस कल्याण केंद्रे निर्माण करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत किती केंद्रे निर्माण करण्यात आली आहेत,

(३) असल्यास, त्याचप्रमाणे राज्यातील पोलीसांच्या स्वास्थाबाबत शासन कोणते प्रयत्न केले आहेत वा करण्यात येत आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) राज्यातील पोलीसांच्या स्वास्थाबाबत शासन निर्णय क्र.पीडब्ल्यूएफ १२०४/१४३/प्र.क्र.२/पोल ७ दि. २ डिसेंबर, २००५ नुसार महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना राबविण्यात येत आहे.

---

## भंडारा येथील सांस्कृतिक भवनाबाबत

**(४४) ३८९९ (१५-०१-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयात सांस्कृतिक वारसा जोपासला जावा कलावंतांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, या उदात्त हेतूने शासनाने शहराच्या केंद्रस्थानी कोट्यवधी रूपये खर्च करून सांस्कृतिक भवन उभारले, मात्र सध्या ही वास्तु भंगारात गेली असून येथे असामाजिक कृत्य मोठ्या प्रमाणात चालत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी एका अनोळखी व्यक्तीचे मृतदेह तसेच नवजात शिशुचे प्रेत ही मिळून आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या सांस्कृतिक भवनाची अधोगती झाल्याचा आरोप कलाकार व नागरीकांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, होत असलेल्या विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-०७-२०१५) :**(१) जिल्हा नियोजन समिती (विकास मंडळ), जि.भंडारा यांचे मार्फत, मंजूर रु.११,१८,३३०/- निधीमधून सन १९८६ मध्ये भंडारा येथे सांस्कृतिक भवन बांधण्यात आले. सन १९९८ पासून सदर इमारत बंद आहे तथापि, तेथे असामाजिक कृत्य होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) पोलीस अधिक्षक, भंडारा यांच्या अहवालानुसार हे खरे नाही.
(३) असे आरोप केल्याचे अवगत नाही.
(४) उपरोक्त (३) येथील परिस्थितीत प्रश्न उपस्थित होत नाही.
(५) प्रसंगत: येथे असे स्पष्ट करण्यात येते की, भंडारा येथे अन्य ठिकाणी नविन नाट्यगृह बांधकामाच्या प्रस्तावाबाबत नगर परिषद, भंडारा यांचेकडून कार्यवाही करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी, भंडारा यांनी कळविले आहे.

---

**सरफडोह (ता.करमाळा) या गावातील नागरिकांच्या सातबारा उताऱ्यातील वर्ग २ च्या नोंदीबाबत**

**(४५) ३९६७ (२२-१२-२०१४). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(२) मौजे सरफडोह (ता.करमाळा) येथील संपूर्ण नागरीकांच्या सातबारा उताऱ्यावर वर्ग २ ची नोंद झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधीत शेतकऱ्यांनी महसूल विभागास जमीन मालकी असलेल्या बाबतचे योग्य ते पुरावे सादर करुनही उताऱ्यावरील वर्ग-२ ची नोंद कमी केली नाही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, महसूल विभागाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०७-२०१५) :**(१) होय, तथापि सध्या वर्ग - २ ऐवजी देवस्थान वर्ग-३ अशा नोंदी करण्यात आलेल्या आहेत.
(२) ही बाब खरी नाही, शेतक-यांनी दिलेली कागदपत्रे, अधिकार अभिलेख, कार्यालयीन अभिलेख व राज्य शासनाच्य पुराभिलेख विभागाकडील सन १८८७-८८ सालातील करमाळा तालुक्यातील दुमाला नोंदवही पाहता सदरची जमीन भागवटादार वर्ग-२ ऐवजी देवस्थान इनामाची असल्याचे निदर्शनास आल्याने सदर जमिनीच्या गा.न.नं.७/१२ इतर हक्कात देवस्थान वर्ग-३ चे शेरे ठेवण्यात आले आहेत.

(३) सदर जमिनीचे गा.न.नं ७/१२ वरील वर्ग-२ शेरा ऐवजी देवस्थान इनाम वर्ग-३ असा शेरा दाखल करण्याचा आदेश तहसिलदार, करमाळा यांनी त्यंचेकडील दि.३०/०२/२०१५ अन्वये केलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिकेच्या शाळा सुरु होऊन अद्यापही विद्यार्थ्यांना**
**शाळोपयोगी वस्तूंचे वाटप न केल्याबाबत**

**(४६) ४१२५ (२३-१२-२०१४). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिकेच्या शाळा सुरु होऊन तीन/चार महिन्याचा कालावधी होऊनही शाळेतील गरीब विद्यार्थ्यांना शाळोपयोगी वस्तूंचे अद्यापही वाटप करण्यात आलेले नसल्याचे माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे ओह काय,
(२) असल्यास, गरीब विद्यार्थ्यांना शाळेपयोगी वस्तुंचे वाटप लवकरात लवकर होण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०७-२०१५) :**(१) व (२) ठाणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने दिनांक ०३.०२.२०१४ ते दिनांक २४.०२.२०१४ या कालावधीत निविदा मागविल्या होत्या. तथापि, लोकसभेची आदर्श आचारसंहिता भंग होऊ नये म्हणुन निविदेसंबंधी पुढील कार्यवाही करता आली नाही.
तद्नंतर या प्रकरणी माहे ऑगस्ट, २०१४ रोजी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येऊन माहे ऑगस्ट, २०१४ पासून सर्व विद्यार्थ्यांना या योजनांचा लाभ देण्यात आला आहे. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांना शाळापयोगी वस्तुंचे वाटप करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुलुंड पश्चिम येथील एस.बी.एस. मार्गावरील सोनापूर नाका तसेच**
**टाटा कॉलनी नाका येथे निर्माण झालेली वाहतुकीची समस्या**

**(४७) ४१६७ (१५-०१-२०१५). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुलुंड पश्चिम येथील एस.बी.एस. मार्गावरील सोनापूर नाका तसेच टाटा कॉलनी नाका येथे मोठ्या प्रमाणात दररोज वाहतुकीची समस्या उद्भवत असून मोठ्या प्रमाणात जनतेला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वाहतुकीची समस्या दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) :**(१) सोलापूर जंक्शन येथील एल.बी.एस. मार्गावरील जलाराम पार्क बिल्डींगच्या समोर फार वर्षापासून टेम्पो स्टँड आहेत. सदर ठिकाणी ट्रक/टेम्पोची डबल पार्किंग झाल्यास काही प्रमाणात वाहतूकीची कोंडी होते.
(२) सोनापूर जंक्शन येथे वाहतूक सुरळीत ठेवण्याकरिता दोन वाहतूक अंमलदारांची नेमणूक केली आहे. टाटा कॉलनी परिसरात गस्त केली जाते. सन २०१४ मध्ये अनधिकृत पार्किंगच्या ९० केसेस करण्यात आल्या आहेत.
या रोडवर सम-विषम पार्किंग करण्याबाबतचा प्रस्ताव वाहतूक पोलीसांच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुणे शहरातील रस्ते बांधणी करताना योग्य नियोजन करणेबाबत

**(४८) ४२१८ (२३-१२-२०१४). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील मोठया खर्चाचे व सिमेंट कॉक्रिट रस्ते बांधकाम करताना पाण्याची लाईन व भूमिगत विदयुतवाहिनी या कामासह पूर्वनियोजन करण्यात येत नसल्याने पूर्ण झालेल्या रस्त्याचे या कामासाठी खोदाई करण्यात आल्याने शासनाच्या निधीचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील मोठे प्रकल्प करत असताना महानगरपालिकाकडून ड्रेनेज लाईन, पिण्याच्या पाण्याची लाईन, भूमिगत विद्‌युतवाहीनी या कामाचे पूर्वनियोजन करण्यात येत आहे काय,
(३) असल्यास, पुणे शहरातील रस्ते बांधणीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर महानगरपालिकेकडून करण्यात आला आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) :**(१) पुणे शहरातील मोठ्या खर्चाचे व सिमेंट कॉक्रिट रस्ते नव्याने करावयाचे झाल्यास पाण्याची लाईन व विद्‌युतवाहिनी या कामासह पूर्व नियोजन करण्यात येत असते, सबब, पाण्याची लाईन व विद्‌युतवाहिनीसाठी पूर्ण करण्यात आलेल्या रस्त्यांची खोदाई करण्यात येत नाही.
(२) शहरातील मोठे प्रकल्प करत असताना पुणे महानगरपालिकेतर्फे तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करणेत येत आहे, तांत्रिक सल्लागारांच्या सल्ल्यानुसार ड्रेनेज लाईन, पिण्याच्या पाईप लाईन व भूमिगत विद्‌युतवाहिनी या कामांचे पूर्व नियोजन करणेत येत आहे.

(३) पुणे शहराचे रस्ते बांधणीत ओव्हरले पध्दतीने कॉक्रिट करणे या आधुनिक तंत्रज्ञानाचा (Use of PMB Batch Mix Plant etc.) वापर करणेत आला आहे. सदर पध्दतीमध्ये अस्तित्वातील रस्त्यांवरच कॉक्रिट करण्यात येत आहे. सदर पध्दतीमुळे साधारण ३ वर्षाने रस्त्याचे पुर्नडांबरीकरणाचा खर्च होत नाही. तांत्रिक सल्लागारामार्फत पुर्वगणनपत्रक तयार करुन निविदा काढण्यात येऊन तात्रिक सल्लागाराच्या सल्ल्यानुसार जागेवर कॉक्रिट काम करण्यात येत आहे.

---

**कल्याणीनगर ते सनसिटी या पुणे मनपा रस्त्यावर दूरध्वनी कंपनीने केलेली अनाधिकृत खोदाई केल्याबाबत**

**(४९) ४२२१ (२३-१२-२०१४). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका हद्दीतील कल्यानी नगर ते सनसिटी या महानगरपालिका रस्त्यावर अनधिकृत खोदकाम करुन खोदकाम केल्याचे दि. १८ नोव्हेंबर, २०१४ रोजी व त्या दरम्यान उघडकीस आले हे खरे आहे काय असल्यास,

(२) याप्रकरणी शासनाने चौकशी केली काय चौकशीमध्ये काय आढळून आले आहे,

(३) दोषी ठेकेदार व संबधीत प्रकरणी डोळेझाक करणा-या अधिका-यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :**(१) पुणे येथील वडगांवशेरी कल्याणीनगर ते सनसिटी या रस्त्यावर अनधिकृत केबल टाकलेचे वृत्त दै.सकाळमध्ये दिनांक १९.११.२०१४ रोजी प्रसिध्द झाले. त्याप्रमाणे जागेवर दिनांक १९.११.२०१४ रोजी जागा पाहणी केली असता सदर ठिकाणी भारती एअरटेल लि. कंपनीने अनधिकृतपणे सुमारे ४३५ र.मी. खोदाई करुन केबल टाकलेचे निदर्शनास आले आहे.

(२) या प्रकरणी महानगरपालिकेतर्फे चौकशी केली असता सदर ठिकाणी भारती एअरटेल लि.कंपनीने अनधिकृतपणे खोदाई करुन केबल टाकलेचे निदर्शनास आल्याने दि. १६/१/२०१५ रोजी येरवडा पोलीस स्टेशन येथे गुन्हा (FIR.१५/१५) दाखल झालेला आहे. तसेच भारती एअरटेल कडून वसुल करावयाची दंडात्मक रक्कम रुपये ७१,३८,८३५/- त्यांचे अन्य कामाच्या अनुषंगाने जमा असलेल्या अनामत रक्कमेमधून वसुल करण्याची कार्यवाही पुणे महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील मलानि:सारण प्रकल्प नसल्याने मुळामुठा**
**प्रदुषण पातळी मोठया प्रमाणात वाढली असल्याबाबत**

**(५०) ४२२४ (२३-१२-२०१४). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातून जाणा-या मुळामुठा नदीमध्ये मोठयाप्रमाणात सांडपाणी सोडण्यात येत असून आवश्यक ठिकाणी मलनि:सारण प्रकल्प नसल्याने मुळामुठा प्रदुषण पातळी मोठया प्रमाणात वाढली असल्याने नदीपाण्यावर अवलंबून असलेल्या क्षेत्रातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे का,

(२) मुळामुठा नदीवर पुणे मनपालिकेचे किती मलनि:सारण प्रकल्प आहेत व या प्रकल्पांची सद्यस्थिती काय आहे,

(३) मुळामुठा नदीतील प्रदुषण कमी करणे अथवा नियंत्रीत करण्यासाठी महानगरपालिकेने वा शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) :**(१) व (२) पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये दररोज ७४४ दशलक्ष लीटर एवढे मैलापाणी तयार होते. मुळा-मुठा नदीवर पुणे महानगरपालिकेचे १० मल:निसारण प्रकल्प असून, या सद्यस्थितीत प्रकल्पांतून ५६७ दशलक्ष लीटर एवट्या मैलापाण्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे. त्यानुसार शहरात निर्माण होण-या एकूण मैलापाण्यापैकी दररोज १७७ दशलक्ष लीटर एवढे मैलापाणी प्रक्रिया विना नदीत सोडण्यात येते, ही वस्तुस्थिती आहे.

(३) पुणे शहरात निर्माण होणा-या संपूर्ण मैलापाण्यावर प्रक्रिया करुन नदीत सोडणेकामी राष्ट्रीय नदी कृती कार्यक्रमांतर्गत प्रकल्प तयार करण्यात आला असून, सदर प्रकल्प जपान सरकारच्या जायका या संस्थेकडे सादर करण्यात आला आहे. सदरची योजना ३-४ वर्षाच्या कालावधीमध्ये राबविण्यात येणार असून, सदर योजना पूर्ण झाल्यानंतर शहरात निर्माण होणाऱ्या संपूर्ण मैलापाण्यावर प्रक्रिया करुन नदीत सोडण्यात येणार आहे.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.